| MHRG110006922022 | |
|---|---|
| | दाखल तारीख – ११.०७.२०२२ |
| | नोंदणी तारीख – ११.०७.२०२२ |
| | निकाल तारीख – १६.०३.२०२६ |
| | कालावधी – ०३ वर्षे, ०८ महिने, ०५ दिवस |

**भाग अ**

**फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (I)**

**माणगांव येथील न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, यांचे न्यायालयात**

**ता. माणगांव, जिल्हा– रायगड.**

**[पिठासिन अधिकारी – श्रीमती अ.प्र.मानव(अ.ब.सोनटक्के)]**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३१४/२०२२**

**निशाणी – ३५ न्यायनिर्णय**

| | |
|---|---|
| **खटला क्रमांक** | संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३१४/२०२२ |
| **गुन्हा रजिस्टर क्रमांक व पोलीस ठाणे** | गु.र.नं.१४१/२०२२<br>माणगांव पोलीस ठाणे. |
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र शासन तर्फे<br>माणगांव पोलीस ठाणे |
| **विरुध्द** | |
| **आरोपी** | **शिध्देश शरद माने,**<br>वय वर्षे ४०, धंदा – वाहन चालक,<br>रा.रुम नं.९५ तिसरा मजला बिल्डींग नं.५ मेघराज को.ऑफ.सोसा.मेघवाडी जोगेश्वरी पुर्व मुंबई नं.६०. |
| **प्रतिनिधीत्व** | |

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | सहा.सरकारी वकील श्री. पी. जे. गावंड |
| **आरोपीतर्फे वकील** | श्री. पी. ए. म्हात्रे |

**<u>भाग ब</u>**

**<u>फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (II)</u>**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | २३.०५.२०२२ |
| फिर्याद पोलीस ठाणेत नोंद झाल्याची तारीख | २३.०५.२०२२ |
| न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केल्याची तारीख | ११.०७.२०२२ |
| आरोपीविरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख | १८.०१.२०२३ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | २१.०४.२०२३ |
| निकालाची तारीख | १६.०३.२०२६ |
| जर शिक्षा दिली असेल तर आदेशाची तारीख | --- |

| | |
|---|---|
| आरोपीचे नाव | शिध्देश शरद माने |
| अटकेची तारीख | -- |
| जामीनावर खुला केलेची तारीख | -- |
| दोषारोप ठेवलेले गुन्हे | भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३७, ३३८ प्रमाणे व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये |
| निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | निर्दोष मुक्त केले. |
| दिलेली शिक्षा | अंतिम आदेशाप्रमाणे |
| फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ संपरीक्षेदरम्यान निरुध्द केलेला | ------- |

| | |
|---|---|
| कालावधी | |

## भाग क

## फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (III)

### अ) अभियोगपक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | शैलेश हरी बिरगावले | फिर्यादी | १४ |
| २. | विजेंद्र विनायक मानकर | साक्षीदार | १८ |
| ३. | संतोष शंकर शिंदे | साक्षीदार | २२ |
| ४. | रावसाहेब ज्ञानदेव कोळेकर | तपासी अंमलदार | २५ |

### ब) बचावपक्षातर्फे साक्षीदारांची यादी – निरंक

### क) अभियोपक्षातर्फे शाबीत करणेत आलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | कागदपत्र | निशाणी |
|---|---|---|
| १. | तक्रार | १५ |
| २. | छापील प्रथम खबरी अहवाल | १६ |
| ३. | घटनास्थळ पंचनामा | २६ |
| ४. | वाहनांच्या तपासणीकरिता पाठविलेले पत्र | २७ |
| ५. | तपासणीचा अहवाल | २८ |
| ६. | वैद्यकीय प्रमाणपत्र | २९ |

### ड) बचावपक्षातर्फे शाबीत करणेत आलेल्या कागदपत्रांची यादी – निरंक

### इ) आरोपीने कबुल केलेल्या कागदपत्रांची यादी – निरंक

## ई) मुद्देमाल यादी – निरंक

## न्यायनिर्णय

(आज दिनांक १६.०३.२०२६ रोजी पारीत)

प्रस्तुत प्रकरणात आरोपीच्या विरोधात भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३७, ३३८ प्रमाणे व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये दोषारोप ठेवण्यात येवून प्रस्तुतचा खटला चालविण्यात आला.

**सरकार पक्षाचे कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे आहेः–**

**०२.** प्रस्तुत प्रकरणात शैलेश हरी बिरगावले हे फिर्यादी आहेत. दि.२३.०५.२०२२ रोजी सायंकाळी ०६.०० पर्यंत फिर्यादी ड्युटी करुन त्यांचे ताब्यातील मोटार सायकल पॅशन प्लस हिरो होंडा क्र. एम.एच. ०६ ए.पी. ८५१३ ही स्वतः चालवित घेवुन जात असताना मौजे तिलोरे गावचे हद्दीत रात्री ०७.०० वा.सु. मुंबई बाजुकडून गोवा बाजुकडे जाणारी इर्टीका कार क्र.एम.एच. ०४ के.एल. १६०० ही समोरुन रस्त्याचे राँग साईडने उजव्या बाजुला येवुन फिर्यादी चालवित असलेल्या मोटार सायकलला ठोकर मारुन अपघात केला. सदर अपघातामध्ये फिर्यादी यांना डाव्या पायाला फ्रॅक्चर झाले व लहान मोठ्या स्वरुपाच्या दुखापती झाल्या. फिर्यादीच्या गाडीचे नुकसान झाले. सबब, आरोपीविरूद्ध कार्यवाही होणेकरीता फिर्यादीने पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

**०३**. फिर्यादीच्या जबाबावरुन माणगांव पोलिस स्टेशन अधिकाऱ्यांनी गुन्हा नोंद क्र.१४१/२०२२ नोंद केला. सदर प्रकरणाचा तपास आर. डी. कोळेकर, पो.हवा./७०९ यांनी केला व तपास पूर्ण होताच वर नमूद कलमांन्वये आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** आरोपीने भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३३७, ३३८ प्रमाणे व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये दंडनीय गुन्हा केल्याचा दोषारोप (निशाणी क्र.११) त्यांच्यावर ठेवला. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे सांगून प्रकरण चालविण्याची विनंती केली.

**०५.** प्रकरणात आरोपीविरुध्दचा आरोप सिध्द करण्यासाठी सरकार पक्षाने साक्षीदार म्हणून पंच साक्षीदार व साक्षीदार यांना तपासले. सदर तपासलेल्या साक्षीदारांच्या साक्षीमध्ये आरोपीच्या विरोधात पुरावा मिळून आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३(१)ब अंतर्गत बयाणे निशाणी क्र.३१ वर नोंदविले.

**०६.** आरोपपत्राच्या अवलोकानावरुन व सरकार पक्षाच्या कथनावरुन मी पुढील मुद्दे विचारार्थ घेतले व त्यावरील निष्कर्षाची कारणमिमांसा मी खालील प्रमाणे केली आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | आरोपीने दिनांक २३.०५.२०२२ रोजी सायंकाळी १९.०० वाजता मौजे तिलोरे गावच्या हद्दीत ता.माणगांव, जि.रायगड येथे आरोपी त्याचे ताब्यातील इर्टीका कार क्र. एम.एच. ०४ / के.एल. १६०० ही हयगयीने, निष्काळजीपणे बेदरकारपणे चालवुन फिर्यादीच्या मोटार सायकल पॅशन प्लस हिरो होंडा क्र. एम.एच. ०६ ए.पी. ८५१३ ला ठोकर मारुन अपघात केला व त्याद्वारे भा.द.वि.चे कलम २७९ अन्वये गुन्हा केला, ही | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | बाब सरकार पक्ष सिध्द करतो काय ? | |
| २. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने वर नमुद वाहन हे रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन हयगयीने, बेदरकारपणे व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या वर नमुद मोटार सायकलला धडक देवून फिर्यादीस किरकोळ दुखापत होण्यास कारणीभुत ठरला व त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड विधानाचे कलम ३३७ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला काय ? | **नकारार्थी** |
| ३. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने वर नमुद वाहन हे रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन हयगयीने, बेदरकारपणे व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या वर नमुद मोटार सायकलला धडक देवून फिर्यादीस गंभीर दुखापत होण्यास कारणीभुत ठरला व त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड विधानाचे कलम ३३८ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला काय ? | **नकारार्थी** |
| ४. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने वर नमुद वाहन सार्वजनिक रस्त्यावर वेगाने आणि सर्वसामान्य जनतेला अपाय होईल अशा रितीने व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालविली व त्याद्वारे | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | आरोपीने मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला काय ? | |
| ५. | अंतिम आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

**निष्कर्षाची कारणमिमांसा**

**०७.** अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील यांचा युक्तीवाद ऐकला. आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. पी. ए. म्हात्रे यांचा युक्तिवाद ऐकला. आरोपीस दोषमुक्त करणेत यावे, अशी विनंती आरोपीतर्फे विधीज्ञांनी केली आहे.

**मुद्दा क्र.१ ते ४ बाबत :-**

पटलावरील उपलब्ध पुरावा एकत्रीत अवलोकनास्तव घेत असताना तथ्याची पुर्नरावृत्ती होवू नये म्हणुन प्रस्तुतचे मुद्दे मी एकत्रीत घेतले.

**०८.** अभियोगपक्षातर्फे फिर्यादी शैलेश (सा.क्र.१) ने पुराव्यात कथन केले की, ते मोर्बा व साई येथे वायरमनचे काम करतात. दि.२३.०५.२०२२ रोजी संध्याकाळी ०६.३० वा.सु. घटना घडली होती. घटनेच्यावेळी फिर्यादी साईवरुन काम संपवुन संध्याकाळी ०६.०० वा.सु. दुचाकी मोटार सायकल क्र.एम.एच. ४६/८५१३ स्वतः चालवित जात होते. मौजे तिलोरे फाटा येथे फिर्यादी पोहोचले असता समोरुन एक चार चाकी इर्टिका कार अतिवेगाने त्यांच्या अंगावर धडक दिली. सदर धडकेमध्ये फिर्यादी यांच्या डाव्या गुडघ्याला व उजव्या पायाला गंभीर दुखापत झाली होती. त्यांचा पाय फॅक्चर झाला होता व दुचाकी वाहनाचे देखील नुकसान झाले. नि.क्र.१५ प्रमाणे सदर फिर्यादी यांनी तक्रार दिली होती. सदर

फिर्यादी यांना नंतर समजले की आरोपी शिध्देश माने हा कार चालवित होता. सदर फिर्यादी यांनी आठ दिवस उपचार घेतले होते. फिर्यादी शैलेश (सा.क्र.१) यांनी त्यांच्या उलटतपासात मान्य केले की, सदर फिर्यादी यांना पोलीस घटनास्थळावर घेवुन गेले नव्हते. सदर फिर्यादी यांनी मोटार वाहन कायद्याअंतर्गत रक्कम मिळण्याकरिता आरोपीविरुध्द कारवाई दाखल केली आहे.

**०९.** अभियोगपक्षातर्फे विजेंद्र (सा.क्र.२) यांना तपासण्यात आले. त्यांनी पुराव्यात कथन केले की, दि.२३.०५.२०२२ रोजी ०६.०० ते ०६.३० वा.सु. सदर साक्षीदार व संतोष असे माणगांव बाजारपेठेत असताना फिर्यादी शैलेश याचा अपघात झाल्याचे त्यांना समजले. सदर साक्षीदार घटनास्थळी गेले असता फिर्यादी शैलेशचे वाहन डाव्या बाजुला पडून मोठे नुकसान झाले होते. तसेच दुसरे वाहन इर्टिका कार क्र.एम.एच. ०४ ए.एल. १६०० ही चालकाच्या बाजुकडील पुढील भाग चेपला होता. शैलेश माणगांवगडून कोलाडकडे जात होता व इर्टिका कार ही मुंबईकडून माणगांवकडे येत होती. शैलेशला दुखापत झाली होती. फिर्यादी शैलेशला सदर साक्षीदार यांनी शासकीय रुग्णालय, माणगांव येथे नेले. पोलीसांनी शैलेशचा व सदर साक्षीदार यांचा जबाब घेतला. विजेंद्र (सा.क्र.२) ने घटनास्थळाच्या वस्तुस्थितीवरुन त्यांच्या निदर्शनास आले की, अपघात हा आरोपीच्या चुकीमुळे घडला आहे.

**१०.** विजेंद्र (सा.क्र.२) यांनी त्यांच्या उलटतपासात मान्य केले की, फिर्यादी शैलेश हे सदर साक्षीदार यांचे चांगले मित्र आहेत. अपघात हा सदर साक्षीदार यांनी प्रत्यक्ष पाहिलेला नाही. अपघात नेमका कसा झाला याबाबत सदर साक्षीदार यांना व्यक्तीशः माहिती नाही.

**११.** अभियोगपक्षातर्फे संतोष (सा.क्र.३) यांना तपासण्यात आले. संतोष (सा.क्र.३) याने पुराव्यात कथन केले की, दि.२३.०५.२०२२ रोजी सायंकाळी ०६.३० वा.सु. फिर्यादी शैलेश यांचा तिलोरे फाटा येथे अपघात झाला होता. फिर्यादी शैलेश हा माणगांववरुन दुचाकीवरुन कोलाड येथे जात होता. समोरच्या इर्टिका गाडीने शैलेशच्या दुचाकी वाहनाला धडक दिली होती. फोनद्वारे सदर साक्षीदार यांना अपघाताबाबत समजले होते. त्यानंतर १५ मिनिटांमध्ये सदर साक्षीदार घटनास्थळी गेले. फिर्यादी शैलेश रोडच्या बाजुला पडलेला होता व त्याचा पाय फॅक्चर झाला होता. दोन्ही गाड्याचे नुकसान झाले होते. दि.२४.०५.२०२२ रोजी पोलीसांनी सदर साक्षीदार यांचा जबाब नोंदविला.

**१२.** संतोष (सा.क्र.३) यांनी त्यांच्या उलटतपासात मान्य केले की, अपघात त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेला नाही. अपघाताबाबतची माहिती त्यांना फोनद्वारे मिळाली होती. फिर्यादी शैलेश व सदर साक्षीदार एकाच ठिकाणी काम करीत असल्यामुळे ते घटनास्थळी गेले होते. अपघात कोणाच्या चुकीमुळे झाला हे सदर साक्षीदार यांना माहिती नाही.

**१३.** अभियोगपक्षातर्फे तपासी अधिकारी आर. डी. कोळेकर (सा.क्र.४) यांना तपासण्यात आले. आर. डी. कोळेकर (सा.क्र.४) याने पुराव्यात कथन केले की, नि.क्र.२६ प्रमाणे त्यांनी घटनास्थळ पंचनामा सिध्द केला. घटनास्थळ फिर्यादीने दाखविले. अपघाताच्यावेळी मुंबई गोवा हायवेवर उजव्या बाजुची लाईन बंद होती व डाव्या बाजुने वाहतुक चालू होती. चारचाकी इर्टीका गाडी ही मुंबईकडून गोवाकडे जात होती व मोटार सायकल ही गोवाकडून मुंबईकडे जात होती. मुंबईकडून गोवाकडे जाणारी लाईन जी चालू होती. त्याच लाईनवर अपघात झाला होता. गोवाकडून मुंबईकडे जाणा–या रोडच्या लाईनचे काम चालू होते. तपासी

अधिकारी आर. डी. कोळेकर (सा.क्र.४) अपघातामध्ये आरोपीची चुक असल्याचे निष्पन्न झाले. तपासाअंती आरोपीच्या गाडीच्या काचावर समोरील वाहनाचा प्रखर लाईट पडून त्याचे संतुलन बिघडले व तो गोवा ते मुंबई जाणा–या बाजुला जावुन धडक दिली व सिमेंटच्या कटड्याला जावुन धडकला असे निष्पन्न झाल्याने आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**१४.** तपासी अधिकारी आर. डी. कोळेकर (सा.क्र.४) यांनी उलटतपासात मान्य केले की, प्रस्तुत प्रकरणात मोटार अपघात क्रमांक दाखल करुन प्राथमिक तपास केलेला नाही. अपघातानंतर जखमी व्यक्ती व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचा जबाब सदर साक्षीदार यांनी नोंदविला नाही. मुंबई गोवा हायवेची गोवाकडून मुंबईकडे जाणारी बाजु बंद होती असे पंचनाम्यात नमूद नाही. पंचनाम्यातील चतुःसिमेमध्ये मुंबई गोवा हायवेच्या दोन बाजु असल्याचे स्पष्ट नमूद केले आहे. इर्टिका गाडीचे समोरील चाक फुटलेले होते व गाडी चालु असताना चाक फुटल्यामुळे अशा प्रकारचा अपघात होवु शकतो.

**१५.** अभियोग पक्षाचा एकंदरीत पुरावा पाहता विजेंद्र (सा.क्र.२) व संतोष (सा.क्र.३) यांनी अपघात प्रत्यक्ष पाहिलेला नसून ते घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाहीत. तसेच सदर साक्षीदारांनी मान्य केल्याप्रमाणे अपघात नेमका कसा झाला हे त्यांना माहिती नाही. संतोष (सा.क्र.३) याने अपघात कोणाच्या चुकीमुळे झाला हे देखील माहित नसल्याचे मान्य केले आहे. विजेंद्र (सा.क्र.२) याने निदर्शनास आलेल्या वस्तुस्थितीवरुन अपघात आरोपीच्या चुकीमुळे घडला असे कथन केले. परंतु सदर साक्षीदाराने निदर्शनास आलेल्या वस्तुस्थितीचे वर्णन केलेले नाही. याउलट अपघात नेमका कसा झाला हे व्यक्तीशः माहित नसल्याचे मान्य केले. त्यामुळे विजेंद्र (सा.क्र.२) व संतोष (सा.क्र.३) यांच्या पुराव्यावरुन ते प्रत्यक्षदर्शी

साक्षीदार नसल्याने त्यांचा पुरावा आरोप सिध्द करण्याकरिता पुरेसा व उपयुक्त नाही.

**१६.** फिर्यादी शैलेश (सा.क्र.१) याने सरतपासामध्ये अपघातातील इर्टीका कार अतिवेगाने फिर्यादीच्या अंगावर त्याची बाजू सोडून आली व धडक दिली असे कथन केले आहे. तसेच निशाणी क्र.१५ वरील तक्रारीमध्ये इर्टीका कार रस्त्याच्या उजव्या बाजुला म्हणजेच चुकीच्या बाजुला येवुन फिर्यादीच्या मोटार सायकलला धडक दिली असे नमूद केले आहे. फिर्यादी शैलेश इर्टीका कार अतिवेगाने आल्याचे देखील कथन केले आहे. परंतु सदर बाब ही निशाणी क्र.१५ वरील तक्रारीत नमूद नाही.

**१७.** अभिलेखावरील निशाणी क्र.२६ वरील घटनास्थळ पंचनाम्यानुसार अपघात हा मुंबईकडून गोवाकडे येणा–या लाईनवर रस्त्याच्या दक्षिण काठावर झालेला आहे. तपासी अधिकारी यांच्या पुराव्यावरुन अपघाताच्यावेळी मुंबई गोवा हायवेची गोवाकडून मुंबईकडे जाणारी बाजु बंद होती व पूर्ण वाहतुक मुंबईकडून गोवाकडे जाणा–या बाजुवरुन दोन्ही बाजुच्या वाहनांची ये–जा चालू होती. अशा पस्थितीमध्ये अपघातातील इर्टीका कार ही मुंबईकडून गोवाकडे जात होती व अपघात हा त्याच लाईनवर घडलेला आहे. परंतु घटनास्थळ पंचनाम्यात सदर बाब नमूद नाही व रस्त्याच्या दोन्ही बाजु चालू असल्याचे नमूद केले आहे. यावरुन स्पष्ट होते की, इर्टीका कार ही चुकीच्या लाईनवर अथवा वाहिनीवर गेलेली नव्हती. तपासी अधिकारी यांनी मान्य केल्याप्रमाणे अपघाताच्यावेळी इर्टीका गाडीचा समोरील चाक फुटलेला होता व तपासी अधिकारी यांनी मान्य केल्याप्रमाणे गाडी चालू असताना चाक फुटल्यामुळे अशा प्रकारचा अपघात होवु शकतो. यावरुन स्पष्ट होते की, अपघाताच्यावेळी इर्टीका कारचे चाक फुटलेले होते. त्यामुळे अपघात हा

नेमका अतिवेगाने चुकीच्या बाजुला आल्यामुळे झाला की गाडीचा चाक फुटल्यामुळे झाला याबाबत शंका निर्माण होते. तसेच अशा परिस्थितीमध्ये आरोपीने नेमका काय निष्काळजीपणा अथवा हयगय केली हे अभिलेखावर विश्वासार्ह पुराव्याआधारे सिध्द झालेले नाही. म्हणून आरोपीने त्याच्या ताब्यातील इर्टीका कार रस्त्याच्या परीस्थितीकडे दुर्लक्ष करून निष्काळजीपणे व हयगयीने चालवून समोरील फिर्यादीच्या मोटार सायकलला धडक दिली, दुखापतीस व नुकसानीस कारणीभूत झाला ही बाब संशयापलीकडे सिध्द झालेली नाही. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, **मुद्दा क्र.१ ते ४** ला **नकारार्थी** निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.५ बाबत** :-

**१८.** मुद्दा क्र.१ ते ४ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात आल्याने आरोपी निर्दोष मुक्ततेस पात्र आहे. उपरोक्त विवेचनानुसार मुद्दा क्र.५ च्या अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१.** आरोपी शिध्देश शरद माने यास फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१) अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३३७, ३३८ प्रमाणे व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये दंडनीय गुन्हा केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

**२.** आरोपीचा पूर्वीचा वैयक्तिक जातमुचलका व जामीन कदबा रद्द करणेत येत आहे.

**३.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७ अ प्रमाणे

प्रत्येकी रक्कम रुपये १५०००/– चा जातमुचलका व जामीन कदबा देऊन पूर्तता करावी.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर)**

SONTAKKE AHILYABAI BALIRAM

Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2026.03.17 16:55:05 +0530

माणगाव. [श्रीमती अ.प्र.मानव(श्रीमती अ. ब. सोनटक्के)]

दिनांकः–१६.०३.२०२६. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माणगाव.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | A.V. Chavan, Stenographer |
| Name of the Court | :- | Smt. A. P. Manav<br>Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.<br>Mangaon. Tal:-Mangaon. |
| Date of decision | :- | 16.03.2026 |
| Order signed by P.O. on | :- | 16.03.2026 |
| Order uploaded on | :- | 17.03.2026 |